| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | **18/07/2012** | | |
| नोंदविला तारीख | : | **18/07/2012** | | |
| निकाल तारीख | : | **26/04/2017** | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | **4** | **9** | **8** |

# खेड येथिल मा. न्यायदंडाधिकारी वर्ग–१ यांचे न्यायालयात
# मुक्काम खेड जिल्हा रत्नागिरी
# ( सौ. एस. आर. पाटील यांचेसमोर )

निशाणी क्रमांक

## नियमीत फौजदारी खटला क्रमांक ८१ सन २०१२

महाराष्ट्र शासन सरकारतर्फे,
(खेड पोलिस ठाणे ता. खेड जिल्हा रत्नागिरी) } ......... फिर्यादी

विरुध्द

1) प्रेमकुशराव परशुराम आंबेडकर,
वय 42 वर्षे, व्यवसाय – भंगार व्यवसाय,
रा. मुळ गाव बनगावा पोस्ट बहुरव्यास ता. मेहधावल, जि. संतकबिर नगर, उत्तर प्रदेश सध्या राहणार आवाशी ता. खेड, जि. रत्नागिरी. } ......... आरोपी

2) भोलाप्रसाद परशुराम राव,
वय 42 वर्षे, व्यवसाय – भंगार व्यवसाय,
रा. मुळ गाव बनगावा पोस्ट बहुरव्यास ता. मेहधावल, जि. संतकबिर नगर, उत्तर प्रदेश सध्या राहणार आवाशी ता. खेड, जि. रत्नागिरी.

3) रामबरन श्रीराम दुलारे,
वय 28 वर्षे, व्यवसाय – भंगार व्यवसाय,
रा. मुळ गाव पिटीयॉ पोस्ट भिवरा, ता. मेहधावल, जि. संतकबिर नगर, उत्तर प्रदेश सध्या राहणार आवाशी ता. खेड, जि. रत्नागिरी. ......... आरोपी

4) बबलुसिंग उदयराजसिंग लोधी,
वय 19 वर्षे, व्यवसाय – भंगार व्यवसाय,
रा. मुळ गाव बनगावा पोस्ट बहुरव्यास ता. मेहधावल, जि. संतकबिर नगर, उत्तर प्रदेश सध्या राहणार आवाशी ता. खेड, जि. रत्नागिरी.

<u>आरोप–भारतीय दंड विधान कलम 511, सह 34 प्रमाणे.</u>

उपस्थितीः–

---

सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती एस. आर. वनकर
आरोपी क्र. 1 ते 4 तर्फे वकील श्री. एस. एस. बुटाला/श्री. एस. एस. शेठ

---

**–: <u>न्या य नि र्ण य</u> :–**

**( <u>निकाल घोषित दि. 26/04/2017</u> )**

**1.** आरोपी क्र. 1 ते 4 यांनी आरोपी क्र. 5 व 6 यांचेसह भारतीय दंड विधान कलम 511 सह 34 प्रमाणे गुन्हा केल्याचे आरोपावरून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

<u>सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u>:–

**2.** फिर्यादी तुळशीराम सुखदेव कोळेकर यांनी दिनांक 22/03/2012 रोजी फिर्याद दाखल केलेली आहे. घटना दिनांक 22/03/2012 रोजी सकाळी 10.00 वाजताचे दरम्याने मौजे आवाशी येथे घड लेली आहे. फिर्यादी हे 400 के. व्ही. ग्रहण केंद्र उपविभाग न्यु कोयना येथे कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणुन काम करतात. दिनांक 22/03/2012 रोजी सकाळी 10. 00 वाजल्यापासुन फिर्यादी त्यांचेसोबत वासुदेव मगरे, हरीभाउ मेटकर, विष्णु खानेकर असे लोटे येथुन 220 के व्ही जाणा–या विद्युत लाईनची देखभाल करीत पुढे आवाशी येथे जंगलमय भागातुन जात असताना त्यांना एक माणुस टॉवर वर चढुन लोखंडी अँगल काढण्याचा प्रयत्न करीत असताना व त्याचे खाली पाच लोक उभे राहुन त्याला मदत करीत असल्याचे पाहिले. तेव्हा त्यांची खात्री झाली की, सदरचे इसम हे टॉवर वरील अँगल खोलुन चोरी करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे त्यांचा पाठलाग केला परंतु ते जंगलमय भागात पळुन जाण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांनी पोलिसांना फोन करू कळविले. पोलिसांना त्यांचा जंगलात शोध घेवून त्यांना पकडले व त्यांचे समोर घेवून आले. तेव्हा पकडलेल्या इसमांनी टॉवर वरील अँगल खोलुन चोरून नेणार

असल्याचे कबुल केले. त्यांचे नाव प्रेमकुशराव परशुराम आंबेडकर, भोलाप्रसाद परशुराम राव, रामबरन श्रीराम दुलारे, बबलुसिंग उदयराजसिंग लोधी, उनवासीसिंग बडगुसिंग लोधी, गंगाराम रामलाल लोधी असे असल्याचे सांगीतले.

3. दिनांक 22/03/2012 रोजी सकाळी 10.00 वाजता अगर त्या सुमारास मौजे आवाशी ता. खेड येथे फिर्यादी व त्यांचे सहकारी लोटे ते आवाशी अशी 220 के व्ही जाणारे विद्युत लाईनची देखभाल करीत असताना आरोपी प्रेमकुशराव परशुराम आंबेडकर, भोलाप्रसाद परशुराम राव, रामबरन श्रीराम दुलारे, बबलुसिंग उदयराजसिंग लोधी, उनवासीसिंग बडगुसिंग लोधी, गंगाराम रामलाल लोधी यांनी तेथील जंगलमय भागातील एका 220 के व्ही च्या विद्युत टॉवर वर चढुन त्यातील लोखंडी अँगल काढुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना मिळुन आले म्हणुन आरोपी क्र. 1 ते 6 यांचे विरूध्द भारतीय दंड विधान कलम 379, 511 सह 34 प्रमाणे गुन्हा केल्याने खेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. नंबर 41/2012 अन्वये नोंदविण्यात आला.

4. आरोपी क्र. 1 ते 6 यांचेवर निशाणी 33 कडे भारतीय दंडविधान कलम 511 सह 34 प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आला. आरोपी क्र. 1 ते 6 यांचे निवेदन नि. 34 ते नि. 39 कडे नोंदविण्यात आले आहे. आरोपींना त्यांच्यावर ठेवलेला दोषारोप मराठीत वाचून दाखविला. आरोपींनी ठेवलेला दोषारोप नाकारला व काम चालविण्याची तयारी दाखवली.

5. आरोपी क्र. 1 ते 4 यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 313

प्रमाणे निवेदन निशाणी 58 ते 61 कडे नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्याविरूध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतलेला आहे. आरोपी क्र. 5 उनवासीसिंग बडगुसिंग लोधी व आरोपी क्र. 6 गंगाराम रामलाल लोधी गैरहजर राहिल्याने दिनांक 26/04/2017 रोजी आरोपी क्र. 1 ते 4 यांचेविरूध्द असलेला खटला आरोपी क्र. 5 व 6 यांचेपासुन वेगळा करण्यात आलेला आहे.

6. सरकारपक्षाने आरोपीविरूध्दची केस शाबित करण्याठी खालील साक्षीदाराचे साक्षी नोंदविलेल्या आहेत.

साक्षीदार क्र. 1 हरिभाउ साहेबराव मेटकर (नि. 43), स्वतंत्र साक्षीदार

साक्षीदार क्र. 2 विष्णु सिताराम घाणेकर (नि. 44), स्वतंत्र साक्षीदार

साक्षीदार क्र. 3 भालचंद्र जनार्दन धालवलकर (नि. 49), तपासिक अंमलदार

तसेच घटनास्थळाचा पंचनामा (नि. 50) वर भिस्त ठेवलेली आहे.

7. सरकारी वकील व आरोपी क्र. 1 ते 4 तर्फे वकील श्री एस. एस. शेठ यांचा युक्तीवाद ऐकला. सरकारपक्षाच्या हकिकतीप्रमाणे खालील प्रश्न माझे विचाराधीन आहेत, त्यावरील निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणमिमांसेसह नोंदवलेले आहेत.

| | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | सरकारपक्षाने आरोपी क्र. 1 ते 4 यांनी आरोपी क्र. 5 व 6 यांचेसह दिनांक 22/03/2012 रोजी सकाळी 10.00 वाजता अगर त्या सुमारास मौजे आवाशी ता. खेड येथे फिर्यादी व त्यांचे सहकारी लोटे ते आवाशी अशी 220 के व्ही जाणारे विद्युत | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | लाईनची देखभाल करीत असताना आरोपींनी तेथील जंगलमय भागातील एका 220 के. व्ही. च्या विद्युत टॉवर वर चढुन त्यातील लोखंडी अँगल काढुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना मिळुन आले म्हणुन आरोपी क्र. 1 ते 4 यांनी आरोपी क्र. 5 व 6 यांचेसह भारतीय दंड विधान कलम 511 सह 34 प्रमाणे गुन्हा केल्याचे शाबित केले आहे काय ? | |
| 2 | काय आदेश ? | आरोपींना अंतिम आदेशाप्रमाणे सोडून देण्यात येते. |

:: का र ण मि मां सा ::

प्रश्न क्रमांक 1 व 2 करिता :–

8. सरकातर्फे साक्षीदार क्र. 1 हरिभाउ मेटकर यांचे जबाबानुसार दि. 22/03/2012 रोजी ते लाईन कॅम्प न्यु कोयना डिव्हीजन रत्नागिरी येथे ज्युनिअर टेक्नीशियन म्हणून नोकरीस असताना व टॉवर लाईनची देखभाल करीत असताना त्यांना टॉवरचे अँगल किंवा लेगपीस टॉवरला नसल्यामुळे त्याबाबत त्यांनी वरिष्ठांना माहिती दिली होती. सदरील साक्षीदाराने उलटतपासामध्ये घटनास्थळ पाहिले नसल्याचे व पोलिसांना जबाब दिला नसल्याचे मान्य केले आहे.

9. सरकातर्फे साक्षीदार क्र. 3 भालचंद्र धालवलकर यांचे जबाबानुसार दि.22/03/2012 रोजी ते लोटे दुरक्षेत्र येथे पो. हे. कॉ. म्हणून कार्यरत असताना सकाळी 10.00 च्या सुमारास त्यांना आवाशी येथून कनिष्ठ तंत्रज्ञान

श्री. कोळेकर यांनी आवाशी येथे जंगलमय भागात असलेल्या 220 के. व्ही. टॉवरचे असलेले अँगल 6 व्यक्ती काढत असताना पाहिल्याबाबत व पाहून पळून जंगलामध्ये गेल्याबाबत फोनवरून कळविले. त्यानुसार ते व इतर पोलीस कर्मचारी आणि खाजगी 3–4 माणसे मदतीसाठी आवाशी येथे गेले व श्री. कोळेकर यांचेकडे त्यांनी ॲंगल चोरणारे इसम कोठे पळाले याबाबत चौकशी केली व त्यांनी दाखविल्यानुसार त्यांनी शोध घेतला असता त्यांना आरोपी क्र. 1 ते 6 मिळुन आले. त्यावेळी त्यांनी आरोपी क्र. 1 ते 6 यांचेकडे विचारपूस केली असता आरोपी क्र. 1 ते 6 यांनी टॉवरवरील लोखंडी अँगल काढून चोरी करीत असल्याचे कबुल केले म्हणून ते आरोपी क्र. 1 ते 6 यांना घेवून दुरक्षेत्रावर गेले व त्यानंतर कनिष्ठ तंत्रज्ञ श्री. कोळेकर यांनी आरोपी क्र. 1 ते 6 यांचे विरूध्द फिर्याद दिली. त्यानंतर त्यांनी गुन्हा नोंदवल्यानंतर घटनास्थळी जावून घटनास्थळाचा नि. 50 नुसार पंचनामा केला व त्यानंतर फिर्यादी बरोबर असलेल्या व पकडलेल्या इसमाकडे गुन्हयाचा तपास केला असता आरोपी क्र. 1 ते 6 के.व्ही.च्या टॉवरवर चढून त्यातील लोखंडी ॲंगल तोडून चोरण्याचा प्रयत्न करीत असताना मिळून आल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्यांनी आरोपी क्र. 1 ते 6 यास अटक करून पंचनामा केला आणि आरोपी क्र. 1 ते 6 यांचेविरूध्द पुरावा आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्यांना विचारलेल्या सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिलेली आहेत.

10. साक्षीदार क्र. 2 विष्णु घाणेकर हे दिनांक 22/03/2012 रोजीचे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत मात्र त्यांची साक्ष सरकारपक्षास मदत

करणारी करणारी नाही. सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासमध्ये सरकारपक्षास पुरक अशी कोणतीही बाब शाबीत झालेली नाही. सदरकामी सरकारपक्षाने फिर्यादी तुळशीराम कोळेकर यांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे फिर्याद शाबित झालेली नाही. सरकारपक्षाच्या एकंदरीत पुराव्यावरून आरोपी क्र. 1 ते 4 यांनी आरोपी क्र. 5 व 6 यांचेसह दिनांक 22/03/2012 रोजी सकाळी 10.00 वाजता अगर त्या सुमारास मौजे आवाशी ता. खेड येथे फिर्यादी व त्यांचे सहकारी लोटे ते आवाशी अशी 220 के व्ही जाणारे विद्युत लाईनची देखभाल करीत असताना तेथील जंगलमय भागातील एका 220 के. व्ही. च्या विद्युत टॉवर वर चढुन त्यातील लोखंडी अँगल काढुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना मिळुन आल्याचे सरकारपक्षाने निंशकपणे शाबीत केलेले नाही. सरकारपक्षाने आरोपीविरूध्दची केस शाबीत करण्यासाठी सबळ व ठोस पुरावा देणे गरजेचे होते. मात्र संपुर्ण पुराव्याचे अवलोकन करता आरोपी क्र. 1 ते 4 यांनी 511 सह 34 प्रमाणे गुन्हा केल्याचे शाबीत होण्याकरीता ठोस व सबळ पुराव रेकॉर्डवर नाही. सबब आरोपीची ठोस व सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे योग्य व संयुक्तिक राहील. सबब, मी प्रश्न क्रमांक 1 चे उत्तर नकारार्थी देत असून प्रश्न क्रमांक 2 चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

1) आरोपी क्र. 1 प्रेमकुशराव परशुराम आंबेडकर, आरोपी क्र. 2 भोलाप्रसाद परशुराम राव, आरोपी क्र.

3 रामबरन श्रीराम दुलारे, आरोपी क्र. 4 बबलुसिंग उदयराजसिंग लोधी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 248 (1) अन्वये भारतीय दंड विधान कलम 511 सह 34 या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

2) आरोपी क्र. 1 ते 4 यांचे बंधपत्र व जात मुचलका रद्द करण्यात येत आहे.

3) आरोपी क्र. 1 ते 4 यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 437–अ चे पुर्ततेसाठी रूपये 5000/– चे वैयक्तिक बंधपत्र देणेचा आहे.

4) आरोपी क्र. 5 उनवासीसिंग बडगुसिंग लोधी व आरोपी क्र. 6 गंगाराम रामलाल लोधी यांचेविरूध्द अजामिनपात्र वॉरंट काढण्यात यावे.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित केला)

ठिकाणी : खेड
दिनांक : 26/04/2017.

(सौ. एस. आर. पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग–1, खेड.